*राष्ट्रवादी कॉंग्रेसचे चंद्रपूर तालुकाध्यक्ष संजय भोंगळे यांचा समर्थकांसह भाजपात प्रवेश*
*राष्ट्रवादी कॉंग्रेसला मोठा धक्का*
================================================================

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे चंद्रपूर तालुकाध्यक्ष संजय महादेवराव भोंगळे यांनी त्यांच्या समर्थकांसह भाजपात प्रवेश घेतला आहे. दिनांक 7 ऑक्टोबर रोजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, आ. नानाजी शामकुळे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या उपस्थितीत संजय भोंगळे यांनी भाजपाचे सदस्यत्व स्विकारले. विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर राकॉ ला मोठा धक्का बसला आहे.

अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी संजय भोंगळे यांना भाजपाचा दुपट्टा घालुन पक्ष प्रवेशाबाबत त्यांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. चंद्रपूर जिल्हयात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात सुरू असलेला विकासाच्या झंझावाताने प्रभावित होवून आपण भाजपात प्रवेश घेतला आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, आ. नानाजी शामकुळे, देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात जिल्हयाच्या विकासात योगदान देण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असल्याचे संजय भोंगळे यावेळी म्हणाले.

संजय भोंगळे यांच्यासह घुग्गुसचे मनोहर भरणे, बाळा पाटील ढोंगे, रामनरेखा कश्यप, सोनु फुलकर, सुरेंद्र वाघमारे, गजानन भोंगळे, पुंडलिक खनके, ब्रिजलाईन अंबलवार, राजकुमार निषाद, मोहम्मद इस्लाम, अंतुर्ला येथील रतिन वासेकर, उसगांव येथील सुधाकर पानघाटे, चिंचाळा येथील सुरेश पाटील पिदुरकर, मनोहर अतकारे, सनी उपाध्ये, गणेश पिंपळशेंडे, अमीत श्रीवास्तव, विशाल राठोड, स्वप्नील गोरे, नेहल मेहरकुरे, आकाश ठेंगणे, विशाल खोब्रागडे या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश घेतला. यासर्व कार्यकर्त्यांचे सुधीर मुनगंटीवार व मान्यवरांनी स्वागत केले.